
दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे मो.नं. ९४२२६६००७७
बीड/महाराष्ट्र | शुक्रवार १७ मे २०२४ | आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ | वर्ष १ ले | अंक २७२ | पाने ४ | किंमत ४ रुपये

# निवडणुकीच्या कारणावरुन व आक्षेपार्ह पोस्टवरुन दोन गटात तुफान दगडफेक

## गावात तणावपूर्ण शांतता : गावात प्रचंड पोलीस बंदोबस्त तैनात

### दोन्ही गटातील 156 जणांविरुद्ध गुन्हा दाखल

केज तालुक्यातील नांदुरघाट येथे निवडणुकीच्या कारणावरून एका नेत्यावर सोशल मीडियावर पोस्ट टाकल्याने गावात दंगल झाली आहे. या प्रकरणी पोलीस आणि एका जखमी व्यक्तीच्या फिर्यादीवरून दोन वेगवेगळे गुन्हे दखल करण्यात आले आहेत. केज तालुक्यील नांदूरघाट येथे दि. १५ में रोजी एकाने एक सोशल मीडियावर निवडणुकीच्या संदर्भात राजकीय नेते आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना चीड निर्माण होईल अशा प्रकारची फेसबुक पोस्ट व्हायरल केली. त्यामुळे गावात तणाव निर्माण झाला आणि आजूबाजूच्या गावातील नेत्यांचे समर्थक एकत्र जमा झाले. जमाव नांदूरघाट येथे जमा होताच त्यांच्यात व प्रतिस्पर्धी गट एकमेकांना भिडले. त्यांच्यात लाठ्या, काठ्या आणि दगड एकमेकांच्या दिशेने भिरकवू लागले. ही माहिती मिळताच दूरस्थ पोलीस ठाणे नांदूरघाट येथे कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी उमेश आघाव यांनी ही माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना देवून जमावाला आटोक्यात आणण्यासाठी जादा पोलीस कुमक पाठविण्याची मागणी केली. त्यानंतर केज सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, पोलीस उपनिरिक्षक राजेश पाटील, पोलीस उपनिरिक्षक वैभव सारंग आणि पोलीस कर्मचारी घटनास्थळी हजर झाले. त्यांनी जमावाला काबूत आणले. दरम्यान या दंगलीत जखमी असलेले राजेंद्र गोपाळघरे यांनी केज पोलीस पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, दी. १५ में रोजी रात्री ८:३० वा दि पत्नी कविता हे घरात असताना १०० ते १५० लोकांचा जमाव आला. त्या जमावाने एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत त्यांनी राजेंद्र गोपाळघरे यांना तुम्ही परवा झालेल्या लोकसभा निवडनुकीत कमळाचे फुलावर मतदान का केले? असे म्हणुन त्यांना मारहाण करण्यास केली. जमावातील लोक त्यांना जिवे ठार मारा असे ओरडु लागले व मारहाण करु करु लागले,




सदर प्रकार पाहुन त्यांची पत्नी कविता ही त्यांना मारहाण करु नका, काय झाले ते सांगा असे म्हणून मला त्यांचे तावडीतुन सोडवीत असतांना त्यातील काही लोकांनी कविता गोपाळघरे यांच्या हाताला धरुन घराबाहेर ओढले. तसेच त्यांच्या हाताला, पायाला व नाकाच्या डाव्या बाजुला लाथा बुक्क्यानी मारहाण केली. जमावातील लोकांचे हातात काठ्या, तलवारी, दगडे होते. त्या पैकी आमोल सखाराम जाधव, श्रीकांत तुकाराम जाधव, सागर तुकाराम जाधव, शंकर भानुदास जाधव, सुधीर जाधव, प्रदिप जाधव व १०० ते १५० लोकांनी मनोज जरांगे पाटील जिंदाबाद अशा घोषना देवुन राजेंद्र गोपळघरे यांच्यावर व घरावर दगडफेक लागले. आमोल जाधव, श्रीकांत तुकाराम जाधव शंकर भानुदास जाधव, प्रदिप जाधव यांचे हातात तलवारी व लोखंडी गज होते. तसेच सागर जाधव याने त्याचे हातातील पिस्टलने हवेत गोळीबार केला. श्रीकांत तुकाराम जाधव याने त्याचे हातातील लोखंडी गजाने माझे डोक्यावर जिवे मारण्याच्या उद्देशाने जबर मारहाण केली तसेच अमोल जाधव याने त्याचे हातातील तलवारीची मुठ कविता गोपाळ घरे यांच्या नाकावर मारून जखमी केले अशा आशयाच्या फिर्यादीवरून के ज पोलीस ठाण्यात आमोल सखाराम जाधव, श्रीकांत तुकाराम जाधव, सागर तुकाराम जाधव, शंकर भानुदास जाधव, सुधीर जाधव, प्रदिप जाधव व १०० ते १५० यांच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गु.र.नं. २५७/२०२४ भा दं वि ३०७, ३५४, ४५२, १४३, १४७, १४८, १४९, शस्त्र अधिनियम ३, ४, २५ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम १३५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील हे करत आहेत.

## दुधाने अंघोळ करत शेतकऱ्यांकडून दरवाढीची मागणी.

**दैनिक वादळ वार्ता**
**छ.संभाजीनगर/चैताली औटे**

जिल्ह्यातील आडगाव बुद्रुक येथे गुरुवारी सकाळी दुधाने अंघोळ करत निषेध आंदोलन करण्यात आले. दुधाला ४० रुपये हमीभाव देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली.या आंदोलनामुळे पुन्हा एकदा दूध दरवाढीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. या आंदोलनामुळे पुढील काही वेळ संपूर्ण रस्त्यावर दुधाचे पाट वाहत असल्याचे चित्र दिसले ,तर काही वेळ वाहतुकीचा खोळंबा झाला होता. दरम्यान सध्या असलेल्या २५ रुपये भावात उत्पादन खर्च निघत नसल्याचे शेतकरी सांगत आहेत. गाय, म्हैस यांचा चारा व संगोपन खर्च अधिक आहे. सरकारकडे वारंवार मागणी करून देखील काहीच ठोस निर्णय घेतला जात नाही ,ही खेदाची बाब आहे त्यामुळे अखेर आंदोलन करावे लागत असल्याची शेतकऱ्यांनी सांगितले. येत्या आठ दिवसात दुधाच्या दरात वाढ न केल्यास जिल्ह्यात येणाऱ्या सर्व दुधाच्या वाहनांची अडवणूक करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. यावेळी जगदीश डवले, विश्वभर हाके ,गणेश हाके, विलास शेळके आदींची उपस्थिती होती.



## क्षय रुग्णांची काळजी घेणे आवश्यक असून सर्वसामान्य जनतेने पुढे यावे-डॉ. मानसी कदम
## अनंतशांती कडून इचलकरंजीतील इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयास संगणक भेट

वादळवार्ता/कुडूत्री क्षय रुग्णांची काळजी घेणे गरजेचे असून सर्वसामान्य जनतेने पुढे यावे असे प्रतिपादन डॉ.मानसी कदम यांनी केले.त्या इचलकरंजी येथे अंतशांतीच्या वतीने आयोजित संगणक संच भेट प्रसंगी बोलत होत्या.

राजर्षी शाहू गव्हर्नमेंट सर्व्हन्ट बँक माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक एम. एस. पाटील यांच्या प्रेरणेने व दुर दृष्टीने स्थापन झालेल्या अनंतशांती बहुउद्देशीय सामाजिक सेवा संस्था, कोल्हापूर यांच्या वतीने इचलकरंजीतील इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयास संगणक संच भेट व तसेच आय.डी.बी. आय बँक शाखा शाहूपुरी जि. कोल्हापूर यांच्या वतीने सी.एस. आर. फंडातून रुग्णालयातील क्षय रुग्णांसाठी ३०० नग हातरुमाल देण्यात आले. संस्थेवतीने संस्था स्थापनेपासून आज अखेर आरोग्य क्षेत्रात विविध उपक्रम राबविले



आहेत. रुग्णालयाचे क्षयरोग तज्ञ डॉ. मानसी कदम यांनी रुग्णालयातील चालू असलेल्या सोयी सुविधांची थोडक्यात माहिती दिली. राजर्षी शाहू गव्हर्मेंट सर्व्हन्ट बँकेचे मा. अध्यक्ष व विद्यमान संचालक मा. मधुकर श्रीपती पाटील (एम. एस) यांच्या हस्ते संगणक संच व रुमाल चे वितरण करण्यात आले.

यावेळी रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. नंदकुमार बनगे सर यांनी या संस्थेचे अध्यक्ष भगवान गुरव कार्याध्यक्ष- माधुरी खोत, संस्थेच्या संचालिका अरुणा पाटील यांचे आभार मानले या प्रसंगी निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अमित सोहनी सर शरीरविकृती शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश मोरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. बागवान, रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी राजेंद्र पाटील, सहा. कार्यालयीन अधिक्षक भारत शिंदे, क्षयरोग विभाग सचिन जाधव ,संभाजी वरुटे आदी उपस्थित होते.

## बर्दापुर प्रकरण; दोन चिमुकल्याचा जीव घेणाऱ्या मातेला केली अटक

**अंबाजोगाई/परवेज पटेल**

अंबाजोगाई स्वयंपाक जास्त का केलास असे सासुने विचारल्यामुळे राग अनावर झाल्याने विवाहितेने स्वतःच्या दोन लेकरांना विषारी औषध पाजून त्यांचा जीव घेतल्यानंतर तीने स्वतःही औषध प्राशन केले. तीला आज बुधवारी दवाखान्यातून सुट्टी झाल्यानंतर बर्दापुर पोलिसांनी या महिलेला अटक आहे अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापुर येथील कौशल्या भिमराव दोडतले (वय 23) टेकडी गल्ली बर्दापुर असे त्या विवाहितेचे नाव असून शुक्रवारी (दि.10 मे) रोजी तीचा पती भिमराव हा सभेला गेला होता यावेळी घरात असलेल्या सासुने स्वयंपाक जास्त का केलास असे कौशल्या भिमराव दोडतले (वय 23) हिला विचारले असता रागाच्या भरात तीने तीन वर्षाची मुलगी प्रांजल व दोन वर्षाचा मुलगा कार्तिक यांना घेवून स्वतःच्या गेली तिथे तीने दोन्ही मुलांना विषारी औषध पाजविले सभा संपल्यानंतर भिमराव घरी आल्यावर आईने त्याला कौशल्या रूसून बसल्याचे सांगितले. त्यानंतर भिमराव खोलीत गेला असता त्यांच्या मुलांच्या नाकाला फेस आल्याचे दिसले त्यावर मुलाच्या नाकाला व्हसलीन लावल्याचे कौशल्याने सांगितले. परंतु मुलांच्या नाकातून रक्तही येत असल्याने आणि मुलांची काहीच हालचाल होत नसल्याने घाबरलेल्या भिमरावाने मुलांना खांद्यावर घेत बाहेर आणले. आणि आरडा ओरडा करून गल्लीतील लोकांना बोलावले. यानंतर कौशल्याने वरच्या खोलीत जावून विषारी औषध प्राषण केले. यानंतर भिमरावाने दोन मुलांसह पत्नीलाही लातूरच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले. परंतु तेथील डॉक्टरांनी दोन्ही मुले मयत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. तर कौशल्यावर उपचार सुरू होते. तिला आज बुधवारी अंबाजोगाईतील रुग्णालयातुन सुट्टी होताच बर्दापुर पोलिसांनी तीला अटक केले आहे. मुलांना मारण्याचे कारण आता पोलिस तपासात उघड होणार आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक पोलिस निरिक्षक महेंद्रसिंग ठाकुर हे करीत आहेत

## नायगाव पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मुंडे यांनी दिले एका मुंगसास जीवदान...!

**नायगाव/रामप्रसाद चन्नावार**

नायगांव पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मारोती श्रीराम मुंडे हे दिनांक 14 मे रोजी गडगा परिसरामध्ये पेट्रोलिंग करत असतानां एका आज्ञात वाहाने वन्यप्राणी मुंगुस यास धडक देऊन जखमी केले होते व रोडवर बेहोश अवस्थेत पडले होते अशा परिस्थिमध्ये स्वतः वनप्राणी मुंगुस याला हिमतीने उचलूस घेऊन तत्काळ लघु पशु वैद्यकीय दवाखाना नायगाव येथे उपचारासाठी आनले असता येथील डॉ सुधाकर साळवे यांनी तात्काळ उपचार केले तेव्हा मुंगुस होश मध्ये आले व वनपरिक्षेत्र अधिकारी निखील हिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिमंडळ अधिकारी एम.डी गुरुपवार व वनसेवक राजकुमार भालेराव यांना संपर्क करून त्यांच्या स्वाधीन केले व सदरील वन्यप्राणी मुंगुस वनपरिक्षेत्राच्या जंगलामध्ये सोडून देण्यात आले एका मुक्या प्राण्या वर कर्तव्य दक्ष पो.नि. मारोती मुंडे. डॉ सुधाकर साळवे. एम.डी. गुरुपवार. राजकुमार भालेराव. यांनी मुंगसास जीवदान दिले.त्याबदल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

## ३४ वर्ष शैक्षणिक कार्य करणारे आदर्श मुख्याध्यापक व्यंकटराव नकाते सेवानिवृत्त

वादळवार्ता/नायगाव नायगाव तालुक्यातील सुजलेगाव येथील कै मोहनराव देशमुख विद्यालयाचे आदर्श मुख्याध्यापक व्यंकटराव नकाते सर ३४ वर्षे शैक्षणिक सेवा पूर्ण करून ३१ मे रोजी सेवानिवृत्त होत आहेत आदर्श मुख्याध्यापक श्री व्यंकटराव नकाते सर यांचा जन्म एक सहा १९६६ रोजी बेटकबिलोली येथे झाला त्यांचे शिक्षण एमए मराठी बीए बीपीएड असून ते १९९१ रोजी कै मोहनराव देशमुख विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून सुजलेगाव सेवेत रुजू झाले १९९१ ते २०२४ पर्यंत आदर्श मुख्याध्यापक शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य त्यांनी केले त्यांच्या हातून आणि एक विद्यार्थी घडले तर ते एक विद्यार्थी शासकीय सेवेत कार्यरत आहेत नकाते सर हे अतिशय मनमिळाऊ व धार्मिक प्रेमळ निखळ मनाचे शिक्षक व मुख्याध्यापक त्यांची ओळख आहे त्यांची शैक्षणिक क्षेत्रातील मुख्याध्यापक म्हणून ३४ वर्ष कै मोहनराव देशमुख विद्यालयाचे आदर्श मुख्याध्यापक सेवा केली त्यांना अनेक आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार प्राप्त झाले त्यांच्या उत्तम मुख्याध्यापक कार्याची दखल घेऊन अनेक कार्यात त्यांचा सहभाग होता सचिव विनाअनुदानित शाळा कृती समितीत १९९४ ते १९९७ तर सदस्य नांदेड शिक्षण मंडळ २००३ ते २००७ सदस्य नांदेड शिक्षण मंडळ २००७ ते २००९ सचिव तालुका मुख्याध्यापक संघ नायगाव सहा वर्ष विद्यमान मुख्याध्यापक संघ नायगाव तालुका अध्यक्ष विद्यमान कोषाध्यक्ष जिल्हा मुख्याध्यापक संघ आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित पंचायत समिती बिलोली राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित २०२३ अधिक महत्त्वपूर्ण पुरस्काराने सन्मानित नकाते सर हे सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक व आध्यात्मिक कार्यात सदैव संक्रिय सहभाग होता अतिशय प्रेमळ मनमिळ स्वभावाचे शिक्षक आदर्श नागरिक अशी त्यांची समाजात ओळख आहे ३१ मे रोजी त्यांच्या शैक्षणिक मुख्याध्यापक पदावरून सेवानिवृत्त होत आहेत त्यांच्या सेवानिवृत्त गौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे



संपादकीय

## इंटरनेट: दूरसंचारचा महत्वाचा भाग!

जागतिक दूरसंचार दिन म्हणून दरवर्षी हा दिवस संपूर्ण जगभर साजरा करण्यात येतो. इ.स.१८६५ साली आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघाची स्थापना करण्यात आली होती. दूरसंचारचे महत्व तसेच त्याची जागरूकता पसरविण्यासाठी दरवर्षी १७ मेला जागतिक दूरसंचार दिवस साजरा करण्यात येतो. दूरसंचाराच्या क्रांतीमुळे आज विश्वभर खुप मोठ्या प्रमाणात बद्दल घडून आले आहेत. दूर असलेल्या व्यक्ती सोबत संपर्क करणे शक्य झाले आहे. पृथ्वीवर घडलेला हा एक अविस्मरणीय बदलच म्हणावा लागेल. अशी रोचक माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दांतून वाचा... संपादक.

मानवाने बुद्धीच्या जोरावर विविध शोध लावून विस्मयकारक प्रगती केली. आज त्याची प्रचिती आपणा सर्वांना येतच आहे. यातील महत्त्वपूर्ण म्हणजे इंटरनेट, संगणक व मोबाईल यांचा शोध होय. हे शोध लागण्यापूर्वीही म्हणजेच राजे रजवाड्यांच्या युगातही संदेशवहन होत होते. मात्र त्या संदेशवहनात बराच वेळ वाया जात असे. मात्र एकोणीसाव्या शतकापासून मानवाने दळणवळणाच्या साधनांमध्ये अनेक आश्चर्यकारक शोध लावले. त्यामुळे मानवाची अधिक वेगाने कल्पनातीत प्रगती होऊ लागली. टेलिफोनच्या शोधाने संदेशवहनाचे अवघड काम सोपे झाले. याचे सर्व श्रेय अलेक्झांडर ग्रॅहम बेल यांना जाते. ध्वनीची कंपने विद्युतप्रवाहाच्या सहाय्याने तारेतून पाठवता येणे शक्य आहे, असे लक्षात येताच बेल यांनी प्रयत्नांती टेलिफोनचे पहिले ओबडधोबड यंत्र बनवले. जगभरातील दूरसंचार क्षेत्रात नियमन करण्यासाठी दि.१७ मे १८६५ रोजी आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटनेची-इंटरनॅशनल टेलिकम्युनिकेशन युनियनची स्थापना झाली. त्या दिवसाचे औचित्य साधून सन १९७३पासून १७ मे हा दिवस जगभर दूरसंचार दिन म्हणून साजरा होत आहे.

# ,मोखाड्यात वादळी वा-यात शेकडो घरांचे नुकसान घराखाली दबून एकाचा मृत्यू, वीजेचे खांब वाकले

# निम्मा जव्हार मोखाडा अंधारात

काल सायंकाळी मोखाडा तालुक्यातील कुर्लोद, मडक्याची मेट, चप्पल पाडा सातुर्ली अशा मोठया प्रमाणावर गावामधून वादळी वारा सुटल्याने अनेक घरांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे तर सातूर्ली येथील नामदेव जाधव (६०) यांचा घराखाली दबून मृत्यू झाला आहे तर येथीलच एक महिलाही जखमी झाली आहे. प्रत्येक गावातील अर्ध्याहून अधिक घरांचे नुकसान झाल्याने सर्व सामान्य लोक हैराण झाले आहेत मोठया प्रमाणात लोकांचा संसार उघड्यावर आला असून अनेक जणांचे धान्य, संसार उपयुक्त उपयोगी साहीत्याची नासधूस झाली आहे मात्र अजूनही अनेक गावांत पंचनामे होणे बाकी आहेत एकीकडे निवडणुकीची रणधुमाळी दुसरीकडे लोकांचे नुकसान यामुळे प्रशासनाचीही धावपळ उडाली आहे.

मोखाडा तालुक्यातील जवळपास ५०हून अधिक गावापाड्याना या चक्रीवादळाचा फटाका बसला असून काही ठिकाणी तर घरांवरील अख्खं छतच गायब झाले आहे. तर शाळा आश्रमशाळा यांचंही या वादळात मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे सुदैवाने सध्या शाळांना सुट्टी आहे अन्यथा मोठी घटना घडली असती. मुळात अवकाळी पाऊस आणि वादळ आल्याने लोकांची कसलीही तयारी नव्हती यामुळे अचानकपणे आलेल्या या वादळामुळे लोक हतबल झाली अनेक ठिकाणी लहान मुले वयस्क नागरीक घरात फसल्याचेही दिसून आले यामुळे तात्काळ रेशनवरील धान्य वितरीत करावे, तात्काळ पंचनामे करून भरपाई द्यावी अशी मागणी आमदार सुनिल भुसारा यांनी केली आहे.

या नुकसानी बरोबरच या वादळामुळे अनेक गावातील वीजेचे खांब पडले असून तारा ही तुटल्या आहेत यामुळे पुढील तीन ते चार दिवस वीज येण्याची शक्यता नसल्याने भितीचे वातावरण असून वादळ अजूनही येण्याची शक्यता असल्याने वीज नाही, फोन बंद अशा स्थितीत शासनाची आप्तीकालीन व्यवस्था कशी पोहचणार हा संशोधनाचा विषय आहे यामुळे लोकांमध्ये घबाराहट आहे.

प्रचार नंतर माझी लोक महत्त्वाची आमदार सुनिल भुसारा यांनी केली नुकसानीची पाहणी

सध्या पालघर लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे सर्व पक्ष आणि त्यांचे प्रचारात मग्न आहेत मात्र अशा स्थितीत आमदार सुनिल भुसारा यांनी मात्र मला माझी लोक महत्वाची असून त्यांचे अश्रू पुसणे मला महत्वाचे आहे असे सांगत मोखाडा पळसपाडा, सातूर्ले, मडक्याची मेट, नांदगांव, झाप आदी भागात प्रत्येक घरातील नुकसानीची पाहणी केली याशिवाय शेतकऱ्यांचे देखील नुकसान झाले त्यांच्या फळबागेचीही पाहणी केली यावेळी जिल्हाधिकारी तहसीलदार महावितरण कृषी अधिकारी यांच्याशी थेट बोलून येथील परस्थितीची माहिती दिली



# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाशिक मध्ये हेलिपॅड वर उतरताच पोलिसांकडून त्यांच्या बॅगांची तपासणी

नाशिक/सुरेश इंगळे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज नाशिक दौऱ्यावर आहेत, दरम्यान एकनाथ शिंदे यांचा हेलिकॉप्टर नाशिक हेलीपॅड वर पोहोचतात पोलिसांनी त्यांच्या बॅगांची तपासणी केली. एकनाथ शिंदे बॅगांमधून पैसे घेऊन जात असल्याचा गंभीर आरोप संजय राऊत यांनी केला होता. दरम्यान यावेळी एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत यांना प्रतिउत्तर देत आम्ही आताही बॅग घेऊन आल्याचे म्हटले आहे. राज्यात लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने प्रचाराचा धुरडा उडत असतांना संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे वर गंभीर आरोप केले होते, एकनाथ शिंदे यांनी नाशिक मध्ये येताना आपल्या सोबत पैशांनी भरलेल्या बॅगा आणण्याचा दावा संजय राऊत यांनी केला होता. संजय राऊत यांनी शेअर केलेला व्हिडिओ नाशिक मधील होता. या व्हिडिओमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेलिकॉप्टर मधून उतरतांना दिसत होते.

हा व्हिडिओ पोस्ट करतांना संजय राऊतांनी लिहिलं होतं की, नाशिक मध्ये "रात्रीस खेळ चाले नुसता पै पाऊस" दोन तासाच्या दौऱ्यासाठी इतक्या जड बँगा पोलीस वाहत आहेत? यातून कोणता माल नासिकला पोहोचला ?निवडणूक आयोग फालतू नाकाबंदी आणि झडत्या घेत आहेत ?महाराष्ट्रात अधिकृत बॅगावाटप सुरू आहे. एकनाथ शिंदे आजही नाशिक मध्ये



असून याच आरोपाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या बॅगाची तपासणी करण्यात आली आहे .एकनाथ शिंदे नाशिक मध्ये हेलीपॅड वर दाखल झाल्यानंतर सर्वांसमोर त्यांच्या बॅगा उघडून तपासणी करण्यात आल्याने अनेकांच्या भुवाया उंचावल्या होत्या. एकनाथ शिंदे यांना जे व्हा पत्रकारांनी संजय रावतांनी बॅगासंबंधी केलेल्या आरोप बद्दल विचारणा केली असता त्यांनी, आम्ही आताही बॅगा घेऊन आलो आहोत, असं सांगत त्यांनी पत्रकारांसोबत जास्त बोलण्यास नकार दिला.

# मतदानाच्या दुसऱ्याच दिवसापासून पंकजाताई मुंडे लागल्या कामाला ; जिल्हाभरातील पदाधिकारी,कार्यकर्त्यांची घेतली भेट

## अपघातात जीव गमावलेल्या थेरला येथील युवकाच्या निधनाबद्दल पंकजाताई व्यथित ; घरी जाऊन परिवाराचे केले सांत्वन

**(परळी वैजनाथ प्रतिनिधी)**

लोकसभा निवडणूकीची मतदान प्रक्रिया काल पार पडल्यानंतर भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे आज सकाळपासून लगेचच कामाला लागल्या. आज दिवसभर त्यांनी परळीतील 'यशश्री' निवासस्थानीं त्यांना भेटण्यासाठी जिल्हाभरातून आलेल्या भाजप-महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांची भेट घेत त्यांच्याशी चर्चा करत मतदान प्रक्रियेचा आढावा घेतला. तसेच निवडणूकीसाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे आभार मानले. आपला विजय निश्चित आहे. मतदार विकासाच्या बाजूने असून तुमच्या आशिर्वादानेच विकासासाठी काम करत राहिल असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, दुपारी त्यांनी मतदानाच्या दिवशी अपघातात जीव गमावलेल्या युवकाच्या



कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले.

जिल्ह्यात सर्वत्र सोमवारी मतदानाची प्रक्रिया उत्स्फूर्तपणे पार पडल्यानंतर पंकजाताई मुंडे आज लगेचच पुन्हा कार्यकर्त्यांत मिसळल्या. सकाळपासून जिल्हाभरातून महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, परळी निवासस्थानी पंकजाताईंना भेटण्यासाठी आले होते. यावेळी पंकजाताईंनी प्रत्येकाकडून मतदारसंघनिहाय आढावा घेत पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. आपण सर्वांनी खूप चांगले काम केले. मतदानादिवशी प्रचंड उन्हात त्रास घेत बुथवर थांबलात, आपण घेतले'असे सांगत सर्वांचे आभार मानले. माझा विजय निश्चित आहे. समाजातील सर्व घटकांसाठी आपण काम करत राहणार आहोत. आपली लढाई कोणत्याही जातीच्या अथवा व्यक्तीच्या विरोधात नव्हती. जिल्ह्याच्या विकासासाठी आपण योगदान देत राहू. बीड जिल्ह्यातील जनता नेहमीच विकासाच्या बाजूने राहिली आहे.जातीपातीला त्यांनी कधीच थारा दिला नाही. या निवडणूकीतही तेच दिसले.जनतेचा आशीर्वाद मला निश्चित मिळेल अशा भावना याप्रसंगी व्यक्त केल्या.

थेरला येथील युवकाच्या निधनाबद्दल पंकजाताई व्यथित ; घरी जाऊन केले परिवाराचे केले सांत्वन मतदानासाठी येत असताना थेरला येथील युवक अंगद रामहरी नागरे याचे शिरूर घोडनदी जवळ रस्ता अपघातात दुःखद निधन झाले. ही बातमी समजल्यावर त्या व्यथित झाल्या. काल सर्वत्र मतदान सुरू असल्याने त्या जाऊ शकल्या नव्हत्या पण आज दुपारी त्यांनी थेरला येथे जाऊन नागरे परिवाराची भेट घेतली व सांत्वन केले. मतदानाच्या दिवशीच आणखी एक घटनेत येवलवाडी येथील सुनिता नागरगोजे यांचा हृदयविकाराने मृत्यू झाला, त्यांच्याही घरी जाऊन पंकजाताईंनी परिवाराची भेट घेतली धीर दिला.

# डोणगांव येथील चालत असलेल्या अखंड शिवनाम सप्ताहाची सांगता

वादळवार्ता/नांदेड नांदेडच्या बिलोली तालुक्यातील डोणगांव बु येथील महादेव मंदिरातील अखंड शिवनाम सप्ताहाची सांगता आज दिनांक १६ मे रोजी शि भ प श्री गुरु १०८ महादेव आप्पा शिवाचार्य महाराज वाईकर तर शि भ प श्री गुरु १०८ विरूपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर यांच्या अमृतउपदेशानी झाली किर्तन आटोपल्यानंतर गावकऱ्यांच्या वतीने साधू संत महंत किर्तनकार प्रवचनकार टाळकरी माळकरी यासह भाविक भक्तांचा व अखंड शिवनाम सप्ताहात उत्तम कार्य करणाऱ्या सर्व भाविकांचा सत्कार करण्यात आला निसर्गाच्या कुशीत वसलेलं महादेव मंदिर परिसर शिवपाठाणे दणाणून गेला होता शिव मंदिरा सोबतच शिखर शिंगणापूर प्रतिसरुप असलेल्या बळी मंदिराचा सुद्धा आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील नामवंत गुणवंत कीर्तीवंत गुनिजन गायक वादक टाळकरी व हार्मोनियम वादक आदींची उपस्थिती होती शिवभक्तांना भक्ती म्हणजे काय



भक्ती का करावी भक्ती केल्याने काय होते प्रसादावरील कीर्तनाची निरूपण अतिशय सोप्या भाषेत श्री गुरु वाईकर महाराजांनी सांगितले तर धर्माचरण कसे केले पाहिजे शिव पाठ केलाच पाहिजे धर्माच्या आचरण केले पाहिजे धर्म म्हणजे काय व महादेव मंदिराच्या परिसर विकास साठी व बारा वर्षे तपोपुर्ती शिवनाम सप्ताह केला पाहिजे असे श्री गुरु १०८ विरूपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर यांनी भक्तांना प्रबोधन केले शिवनाम सप्ताह सांगता नंतर भव्य महाप्रसादाचा आयोजन करण्यात आलं होतं व महाप्रसादाने शिवनाम सप्ताहाची सांगता झाली हनुमंत चंदनकर नांदेड

## बंद सिग्नलमुळे वाहतूक कोंडी कायम-ॲड.मनोज संकाये
## पंचम ज्योतिर्लिंग वैद्यनाथ मंदिरसमोरही वाहतुक विस्कळीत

**(परळी वैजनाथ प्रतिनिधी)** वाहतूक नियमांचे पालन होत नसल्याने शहरातील वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. परिणामी, वाहतूक कोंडीची समस्या कमी होण्याऐवजी वाढतच चालली आहे. वाहतूक कोंडीला काही प्रमाणात का होईना आळा बसवा यासाठी शहरातील राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ.शामाप्रसाद मुखर्जी येथे उभारण्यात आलेले सिग्नल बंद असून, नागरिक सिग्नल बंद असल्याने नियम पाळत नसल्याचे पहावयास मिळत आहे. पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ मंदिर परिसरातही सिग्नल बसवावेत व पी वन, पी टू पार्किंगचा प्रयोग पुन्हा सुरू करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड.मनोज संकाये यांनी केली आहे. शहरातील अरुंद रस्ते, त्यावर फेरीवाले, छोटे-मोठे व्यावसायिक व वाहन धारकांनी केलेले अतिक्रमण, वाहतूक नियमांची पायमल्ली यामुळे परळी शहरातील वाहतूक समस्या जटील बनली आहे. नागरिक जागा मिळेल तिथे दुचाकी व अन्य वाहने उभी करत आहेत. मोंढा मार्केट, राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक, स्टेशन रोड, छत्रपती



शिवाजी महाराज चौक, वैद्यनाथ मंदिर परिसर या भागात रोजच वाहतुकीचा खोळंबा होत आहे. शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी शहर वाहतूक शाखेने तात्काळ लक्ष देवून या ठिकाणी वाहतूक सुरळीत करावी अशीही मागणी केली आहे. काही वर्षांपूर्वी शहरात सुरू करण्यात आलेला पी वन, पी टू पार्किंगचा प्रयोग सध्या बंदच असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूने दुचाकी व चारचाकी वाहने उभी राहत आहेत. विशेषतः बाजारात दुचाकी वाहनांमुळे रस्ता अरुंद होत आहे. शहर वाहतूक शाखेने पाठपुरावा करून वाहतूक सिग्नल पुन्हा सुरू करावेत तसेच शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी नागरिकांनीही वाहतूक नियमांचे पालन करणे गरजेचे आहे.

## स्मशानभूमी अभावी अंत्यविधी करण्याच्या कारणावरून वाद

(बीड प्रतिनिधी) आयुष्यभर संघर्ष केल्यानंतर निदान मृत्यु तरी सुखासुखी व्हावा अशी सर्वसामान्य माणसांची ईच्छा असते मात्र मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांना त्यांच्या अंत्यविधीसाठी संघर्ष करावा लागतो.वेगवेगळ्या समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमी आहेत.तर काही ठिकाणी स्मशानभूमीची दुरावस्था झालेली आहे.काही ठिकाणी काटेरी झुडुपातुन वाट काढत दहनशेडकडे जावे लागते. ग्रामीण भागातील स्मशानभूमीची अवस्था मरणासन्न असुन जागेअभावी काहींना शेतात, उघड्यावर किंवा नदीकाठी अंत्यसंस्कार करावे लागत आहेत. बीड तालुक्यातील पालवण येथे मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याच्या कारणावरून वाद झाला.मागासवर्गीय समाजाच्या स्मशानभूमीचे बांधकाम झालेले नसल्याने सार्वजनिक स्मशानभूमीमध्ये वादविवाद होऊन अखेर गुन्हा दाखल झाला आहे. त्यावेळी नातेवाईकांनी मृतदेह केज तहसिल कार्यालयात आणुन ठेवला होता. गेवराई तालुक्यातील सुशी (वडगाव) गावात दि.२१ डिसेंबर २०२३ रोजी तुळशीराम कलेढोण वय ५४ वर्षे यांचा मृतदेह गावातील लोकांनी सरकारी ओढ्यात अंत्यसंस्कार करण्यास विरोध केल्याने ग्रामपंचायत कार्यालयासमोर ठेवण्यात आला होता. ६५६ गावात प्रेत जाळण्यासाठी स्मशानभूमीच नाही, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला सोयरसुतक नाही :- डॉ.गणेश ढवळे बीड जिल्ह्यातील १३९४ पैकी ६५६ लहान मोठ्या गावात स्मशानभूमीची सोय नसल्यामुळे पावसाळ्यात मृतदेहाची हेळसांड होत असुन अस्तित्वात असलेल्या स्मशानभूमीची दुरावस्था झाली असुन अंत्यसंस्कार दरम्यान काही गावांमध्ये वादविवाद होऊन सामाजिक स्वास्थ्य बिघडत असल्याने तातडीने उपाययोजना करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर "पिंडदान आंदोलन" "सरण रचुन सरणावरती ठिय्या आंदोलन" "मृतदेह शासन दारी" आदि लक्ष्यवेधी आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष्य वेधण्याचा प्रयत्न केला मात्र लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासन यांना स्मशानभूमी अभावी मृतदेहाची हेळसांड आणि गावात वादविवाद होत असताना सोयरसुतक नसल्याचे दिसून येत आहे.

# पो नि. खाडेच्या पापाचा घडा भरला

गुन्ह्यात आरोपी न करण्यासाठी एका बिल्डरकडून एक 'कोटी रूपयांची लाच मागितली. त्यातील पहिला हृता पाच लाख रूपये खासगी व्यापाऱ्याकडे देण्यास सांगितले. लाच स्विकारताच व्यापाऱ्याला बेड्या ठोकल्या. तर लाच मागणारा आर्थिक गुन्हे शाखेचा पोलिस निरीक्षक हरिभाऊ खाडे आणि प्रोत्साहन देणारा हवालदार हा फरार आहे ही कारवाई बीडच्या एसीबीने बुधवारी सायंकाळी बीड शहरातील सुभाष रोडवर केली. याप्रकरणी रत्री उशिरा बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासह आज पोलीस निरीक्षक हरीभाऊ खाडे व हवालदार आर.बी.जाधवर यांचे निलंबन करण्यात आले आहे. आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हरिभाऊ खाडे, हवालदार आर.बी.जाधवर आणि खासगी व्यापारी कौशल प्रवीण जैन (रा.बीड) अशी आरोपींची नावे आहेत. बीडमधील जिजाऊ मल्टीस्टेचा प्रमुख बबन शिंदे याने पांगरी रोडवर शाळा बांधली होती. त्याच्या बांधकामासाठी लागणारे साहित्य तक्रारदाराने दिले होते. त्याचे पैसेही तक्रारदाराला शिंदे याने दिले. परंतू ठेविदारांनी गुन्हा दाखल केल्यानतर याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे गेला. त्यात बँक स्टेटमेंटमधून पैसे तक्रारदाराच्या खात्यावर गेल्याचे दिसले. त्याप्रमाणे पोलिस निरीक्षक खाडे यांनी दोघांना बोलावून घेतले, तुम्हाला या गुन्ह्यात आरोपी करत नाही, त्याच्या बदल्यात प्रत्येकी ५० लाख रूपये असे १ कोटी रूपये लाचेची मागणी केली. चार महिन्यांपासून खाडे हे त्यांना त्रास देत होते. अखेर १३ मे S रोजी रात्री उशिरा बीडच्या लाचलुचपत प्रतिबंधक पथकाकडे तक्रार केली त्यानंतर १४ मे रोजी खात्री केली. १५ मे रोजी पैसे घेऊन तक्रारदार गेला. यावर खाडे याने आपण पुण्याला आलो असून जैन या व्यापाऱ्याकडे पैसे देण्यास सांगितले. जैनने पैसे स्विकारताच एसीबीने त्याला पकडले. त्यानंतर खाडे आणि हवालदार जाधवर यांचा शोध सुरू केला. परंतू रात्री उशिरापर्यंत ते मिळून आले नव्हते. ही कारवाई बीडचे उपअधीक्षक शंकर शंदे, भारत गारदे, अमोल खरसाडे, अविनाश गवळी, हनुमंत गोरे, सुरेश सांगळे, अंबादास पुरी आदींनी केली.शासकीय कामात अडथळा आणून ते काम मार्गी लावण्यासाठी कोणी जर पैशाची मागणी करत असेल तर पैसे न देता संबंधित तक्रारदाराने आमच्याशी तक्रार करावी. तक्रारदाराचे नाव गुपित ठेवण्यात येईल.



# आरोपींवर कडक कारवाई करण्याची अंबाजोगाई येथील ब्राह्मण समाजाची शासनाकडे मागणी

(अंबाजोगाई प्रतिनिधी) बीड येथील पिंपर गव्हाण रोड येथे ब्राह्मण कुटुंबावर ( अशोक राऊतमारे) मतदान करण्यावरून झालेल्या अमानुष अत्याचाराच्या निषेधार्थ दि.16/05/2024 रोजी मा.उप विभागीय अधिकारी , अंबाजोगाई यांना सकल ब्राह्मण समाजा च्या वतीने निवेदन देण्यात आले व आरोपींवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी पेशवा प्रतिष्ठान चे राहुल कुलकर्णी,डॉ संकेत तोरंबेकर, शिरीष हिरळकर अक्षय देशमुख , विशाल जहागीरदार, दीपक कुलकर्णी ,ॲड वैजनाथ वांजरखेडे,विवेक देशमुख,महेश कुलकर्णी, अनिकेत कुलकर्णी, सचिन कन्नडकर, डॉ कौस्तुभ कुलकर्णी, तेजस हसेगावकर, राहुल सारणीकर, मंदार काटे, अमोल विडेकर, ब्राह्मण सभेचे अनिरुध्द चौसाळकर, अखिल भारतीय पेशवा संघटनेचे संजय देशपांडे, अभय जोशी, विवेक वालेकर, ज्येष्ठ समाजसेवक दुर्गादास दामोशन ,योगेश्वरी वधुवर मंडळाचे प्रभाकर सेलमुकर, दीनदयाल बँकेचे संचालक मकरंद सोनेसांगवीकर, पत्रकार अविनाश मुडेगावकर यांची उपस्थिती होती. पेशवा प्रतिष्ठान अंबाजोगाईचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# शिरूर येथे पहिल्या एकता बालकुमार संस्कार शिबीराचे उद्घाटन

**(शिरूर प्रतिनिधी)** एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आणि श्री क्षेत्र सिद्धेश्वर संस्थान शिरूर कासार यांच्या संयुक्त विद्यमाने सिद्धेश्वर मंदिराच्या प्रांगणात कालपासून पहिल्या एकता बालकुमार संस्कार शिबीराला सुरूवात झाली असून श्री क्षेत्र सिद्धेश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. सकाळी 6 ते 10 व सायंकाळी 5 ते 7 या वेळेत पाच दिवस सदरील शिबिर संपन्न होणार आहे. 15 ते 19 मे दरम्यान पार पडणाऱ्या या शिबिरात पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले जाणार असल्याची माहिती एकता फाउंडेशन च्या पदाधिकाऱ्यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिली. दैनंदिन कार्यक्रमात सकाळी 6 ते 7:30 योग प्राणायाम त्यानंतर 8 ते 8:30 गीतापाठ, 8:30 ते 9 हस्तकला, 9 ते 9:30 बोधकथा, 9:30 ते 10 सुगम संगीत असे कार्यक्रम होणार आहेत. सायंकाळी 5 ते 6 या वेळेत मैदानी खेळ, 6 ते 6:30 नृत्य कार्यशाळा आणि 6:30 ते 7 या वेळेत विविध विषयांवर मुक्तसंवाद होणार आहे. शिरूर आणि पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांनी या बालकुमार संस्कार शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन एकता फाउंडेशनच्या वतीने संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड, सचिव पत्रकार गोकुळ पवार, उपाध्यक्ष नितीन कैतके, मिरा दगडखैर, कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर, सहसचिव लखुळ मुळे, महिला आघाडी प्रमुख रंजना फुंदे, सल्लागार ॲड.भाग्यश्री ढाकणे, संस्थापक सदस्य राजेश बीडकर, कैलास तुपे, दिपक महाले, देविदास शिंदे, पु.ना.बारडकर, प्रा.डॉ.प्रकाश वाकळे, महादेव राऊत, डॉ.शोभा सानप, फौजी कैलास खेडकर, मल्हारी खेडकर, हरिप्रसाद गाडेकर यांनी केले आहे.



# सायली वीर ने ९५% गुण घेऊन सी.बी.एस.ई.दहावी बोर्डात प्रथम.



(बीड प्रतिनिधी) बीड सी.बी.एस.ई दहावी बोर्डाचा निकाल दि.१३ मे २०२४ वार सोमवार रोजी दुपारी घोषित झाला. यामध्ये ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल,बीड चा शंभर (१००%) टक्के निकाल लागला आहे सी.बी. एस. ई.दहावी बोर्ड परीक्षेत सायली सदानंद वीर ९५% घेऊन शाळेतून प्रथम क्रमांक मिळवला. कोणतेही कोचिंग क्लास किंवा इतर शिकवणी न लावता केवळ अभ्यास करून यश प्राप्त केले. श्री.संत ज्ञानेश्वर इंग्लिश पब्लिक स्कूलच्या शिक्षक वर्गाचे व सायली च्या आई,वडिलाचे मार्गदर्शन मोलाचे ठरले असून सायलीच्या अभ्यास करण्याच्या पद्धत व परिश्रम,शिक्षणाची आवड मोलाचे ठरले आहे. तसेच हर्षल लक्ष्मण कोलगुडे ९४.४%, तनिष विशाल धांडे ९३.२%, चैतन्य अंकुश घोलप ८७.८%, नीदा ग फार शेख ८७.६%, टक्के मार्क मिळवले आहे. ९ ०% च्या वरती ०३ तर ८०% टक्के च्या वरती १४, ७०% टक्के च्या वर १२,६०% टक्के ची कायम ठेवली आहे. संस्थेच्या संचालकांनी वेळोवेळी मार्गदर्शनामुळेच हे सर्व शक्य झालं आहे.या शाळेची परंपरा कायम राखन्यात यश मिळाले आहे. १० वी बोर्डमधील सर्व विद्यार्थ्यांचे पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देऊन स्वागत करण्यात आले. सायली वीर ला मिळालेल्या जिद्द व यशाबद्दल शिक्षकवर्गतून आईवडील,नातेवाईक सर्वच स्तरातून,माध्यमातून सत्कार करून पेढे भरवण्यात आले व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# प्रदिप मोरे यांना ' संजीवनीचा शब्द शिल्प पुरस्कार ' जाहीर

.नायगाव बु ॥ येथिल प्रा. प्रदिप मोरे यंदाचा संजीवनी संस्थेचा ' शब्द शिल्प काव्य पुरस्कार जाहीर करण्यात आला असून दि. ६ जून रोजी ' एका सोहळ्यात सदर पुरस्कार माधवराच्या ' हस्ते प्रदान करण्यात येणार आहे . श्री शिवाजी विदयालयाचे कार्यकारी संचालक ' तथा मुख्याध्यापक ' श्री प्रदिप अच्युतराव मोरे . शिवाजी नगर रा . नायगाव बु ॥ हमु चिखली . यांना यवर्षीचा संजीवनी बहु . शिक्षण प्रसारक संस्था केळवद ता चिखली या ' महाराष्ट्र शासन पुरस्कार ,प्राप्त संस्थेचा सन्मानाचा साहित्य सेवेचा ' शब्द शिल्प काव्य पुरस्कार ' संस्था अध्यक्ष ' डॉ . निवृत्तीभाऊ जाधव यांनी जाहीर केला आहे . या संस्थेच्या व्दारे विविध क्षेत्रातील मान्यवराचा पुरस्कार देवून गौरव केला जातो . प्रदिप मोरे हे गेल्या २० वर्षापासून साहित्य सेवा करीत आहे . ' शिंपले मोती ' हा साहित्य चळवळी साठी चालविले मासिक अंक . व त्याचे संपादन केले असून विदर्भ साहित्य संघाचा राज्य स्तरीय काव्यलेखन पुरस्कार ' दै. लोकसत्ता ' लेखन ' पुरस्कार ' साहित्य कुंज ' पुरस्कार खामगांव . तसेच स्व . हरणे राज्य स्तरीय काव्य पुरस्कार आणि पुणे येथिल साहित्य कलायात्री ' अक्षर कुंज ' राज्यस्तरीय पुरस्कार . तसेच जीवन ज्योती काव्य पुरस्कार आदी मिळाले असून प्रदिप मोरे उज्जैनकर फाऊंडेशन मुक्ताईनगर जि. जळगाव शाखा बुलढाणा चे सहसचिव म्हणून कार्यरत आहेत . तर ममता एनजीओ फेडरेशनचे ते जिल्हा सदस्य आहेत . विविध काव्य साहित्य मेळाव्यात त्यांचा उत्फुर्द सहभाग असून ' सामाजिक कार्या बरोबरच त्याचा साहित्य प्रवासही सुरु आहे . सदर पुरस्कार मिळाल्यामुळे त्याच्या वर चाहत्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .

# सुमित वाघमारे खून प्रकरणाचा निकाल लागला

बीड / प्रतिनिधी : शहरात २०१८ मध्ये गाजलेल्या सुमित वाघमारे खून प्रकरणाचा निकाल लागला असून यामध्ये आरोपी बालाजी लांडगे व संकेत वाघ या दोघांना जन्मठेपीची शिक्षा गुरूवार दि.१७ रोजी दुसरे सत्र न्यायालयाने सुनावली आहे. तर या प्रकरणात दोघांना पुराव्या अभावी निदाऱ्ष मुक्त केले आहे. शहरातील आदित्य इंजिनिअरींग महाविद्यालयात सुमित वाघमारे आणि भाग्यश्री हे दोघे शिक्षण घेत होते. या दोघांचे एकमेकांवर प्रेम होते. भाग्यश्रीने घरातील लोकांच्या इच्छविरोधात सुमितशी विवाह केला होता.ही बाब सतत भाग्यश्रीचा भाऊ बालाजी लांडगे यास खटकत होती.दि.१९ डिसेंबर २०१८ रोजी इंजिनिरिंगचा शेवटचा पेपर देवून सुमित वाघमारे आणि भाग्यश्री वाघमारे हे महाविद्यालयाच्या बाहेर आले असता या ठिकाणी भाग्यश्रीचा भाऊ बालाजी लांडगे व त्याचा मित्र संकेत वाघ हे दोघेजण दबा देवून होते. सुमित कॉलेजच्या बाहेर पडताच तो दुचाकीवर असताना बालाजी लांडगे याने त्याच्यावर चाकुने वार केला. तो खाली पडल्यानंतर संकेत वाघ याने त्यास पकडले आणि बालाजीने पुन्हा त्याच्या छातीत व पोटावर सहा वार केले. यावेळी भाग्यश्रीने हा वाद सोडविण्याचा प्रयत्न केला असता तिला ढकलून देण्यात आले. जखमी अवस्थेत सुमित रस्त्यापर्यंत पळत आला मात्र या ठिकाणी कोसळल्यानंतर बालाजी आणि संकेत घटनास्थळावरून फरार झाले. सुमितला उपचारासाठी जिल्हा रूग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासणी करून त्याचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले. या प्रकरणी पेठ बीड पोलिस ठाण्यात भाग्यश्री वाघमारे हिच्या फिर्यादीवरून कलम ३०२,३४ भादविनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचा तपास तत्कालीन पो.नि. पंकज उदावंत यांनी केला असता या तपासामध्ये कृष्णा क्षीरसागर व गजानन क्षीरसागर या दोघांच्या सहकार्याने कटकारस्थान रचल्याचे तपासात उघड झाले होते. त्यामुळे या प्रकरणात भाग्यश्रीच्या फिर्यादीवरून अॅट्रॉसिटीचाही गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास पूर्ण करून प्रकरण बीडच्या दुसरे सत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी न्यायालयाने ३५ जणांच्या साक्षी नोंदविल्या.न्यायालयाने सर्व साक्षी पुराव्यावरून आरोपी बालाजी लांडगे व संकेत वाघ यांना दोषी ठरवून जन्मठेपीची शिक्षा सुनावली तर कृष्णा आणि गजानन क्षीरसागर यांची पुराव्याअभावी निदाऱ्ष मुक्तता करण्यात आली आहे. या प्रकरणी सरकारी पक्षाच्या वतीने सहाय्यक सरकारी वकील अॅड मिलींद वाघीरकर यांनी काम पाहीले. तर पैरवी अधिकारी म्हणून मिसाळ यांनी सहकार्य केले.

# कोविड वारिअर रेणुका फाउंडेशनच्या वतीने अनाथालयात साहित्याचे वाटप

माजलगाव, दि. 16 प्रतिनिधी: येथील कोविड वारिअर रेणुका वाघमारे यांच्या तिस-या पुण्यस्मरण दिनानिमीत्त वडवणी तालुक्यातील ढेकणमोहा येथील पसायदान अनाथालयातील मुलांना खाउ, शालेय साहित्य तसेच एक क्विंटल ज्वारीचे वाटप आज दि. 16 मे 2024 रोजी करण्यात आले. येथील रेणुका अभिमन्यु वाघमारे या शासकीय रूग्णालयात नर्स म्हणुन कार्यरत होत्या तर कोरोना काळातही त्यांनी उल्लेखनिय कार्य केलेले आहे. याकाळातच त्यांना देखिल कोरोनाची लागण झाली आणि यातच त्यांचा मृत्यु झाल्याची दुःखद घटना 2021 मध्ये घडली. तेंव्हापासुन वाघमारे कुटूंबीयांनी कोविड




वारिअर रेणुका फाउंडेशनची स्थापना केलेली असुन त्या फाउंडेशनच्या अंतर्गत विवीध समाजोपयोगी उपक्रम राबविलेले आहेत. यामध्ये संविधान दिनानिमीत्त सर्व शासकीय कार्यालयात संविधानाची प्रत वाटप, रक्तदान शिबीर, शासकीय रूग्णालयात फळ वाटप, शासकीय रूग्णांलयातील गोर, गरिब, गरजुवंत रूग्णांना आर्थिक मदत असे विवीध सामाजिक उपक्रम राबवित त्यांच्या स्मृती जपण्याचे काम केले आहे. यावर्षी देखिल स्व. रेणुका वाघमारे यांच्या तृतीय पुण्यस्मरण दिनानिमीत्त वडवणी तालुक्यातील ढेकणमोहा येथील पसायदान अनाथालयातील मुलांना खाउ, शालेय साहित्य तसेच एक क्विंटल ज्वारीचे वाटप करण्यात आले. यावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष अनिकेत वाघमारे, पसायदानचे अनाथालयाचे श्री. दराडे, श्रीमती दराडे व अनाथालयातील चिमुकले व वाघमारे कुटूंबीय उपस्थित होते. दरम्यान मिळालेल्या खाउने चिमुकल्या अनाथ विद्यार्थ्यांच्या चेह-यावर हास्य उमलले होते.

## राऊतमारे कुटुंबावर हल्ला करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

माजलगाव प्रतिनिधी : बीड तालुक्यातील पिंपरगव्हाण येथील अशोक राऊतमारे या ब्राह्मण कुटुंबाच्या घरावर दगडफेक करण्यात आली तसेच आमच्या पक्षाला मतदान का केले नाही म्हणून राऊतमारे कुटुंबाचे विरोधात घोषणा देत घरासमोरील वाहनांची तोडफोड करीत कुटुंबातील सर्वांना मारहाण करण्यात आली यासाठी घटनेचा सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करण्यात येत आहे तसेच या प्रकरणातील हल्लेखोर गावगुंडांना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी या संदर्भात जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले. बीड येथील ब्राह्मण कुटुंब आपल्या मतदानाचा हक्क कुर्ला गावी बजावून आले त्यानंतर गावातील काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी आमच्या पक्षाला मतदान का केले नाही म्हणून राऊतमारे यांच्या विरोधात घोषणाबाजी करीत घरावर तुफान दगडफेक केली तसेच घरातील सर्व व्यक्तींना मारहाण करण्यात आली एवढ्यावरच न थांबता घरासमोरील वाहनांची तोडफोड करण्यात आली या घटनेचा माजलगाव ब्राह्मण समाजाच्या वतीने निषेध करण्यात आला तसेच सदरील गावगुंडांना अटक करण्यात यावी व योग्य ती कारवाई करण्यात यावी असे निवेदन माननीय तहसीलदार व उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आले याप्रसंगी ब्राह्मण समाजाचे चंद्रकांत देशमुख, वैभव जोशी, दत्ता महाजन, प्रशांत पाटील, राजेश देशमुख, किरण करंजकर,अनिकेत भिलेगावकर, गणेश कुलकर्णी, पराग खोडसकर, स्वानंद नाईक, भालचंद्र पाठक अमोल जोशी व इतर समाज बांधव उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलीस छेडणाऱ्यास धारूर पोलिसांनी केले जेरबंद,,,!

## अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही,,!

## अविनाश पिंगळे व वैभव इंगळे यास मोठ्या शिताफेने केले अटक,,,!आरोपी विरुद्ध पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल,,!

(धारुर प्रतिनिधी) अल्पवयीन मुलीची छेड काढून, तिला त्रास देणाऱ्या आरोपीविरुद्ध 354, 354 (अ) 354,(ड)323, 504, 506 34 भादविसह कलम 12 पोक्सो तसेच कलम 3 (1) ( w) 3 (r) (n), 37( 2) ( va) धारूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला असून, आरोपी नामे अविनाश पिंगळे व वैभव इंगळे या दोन आरोपींना धारूर पोलिसांनी मोठ्या कसरतीने अटक केली आहे. तालुक्यातील अल्पवयीन मुलीची छेड काढून आरोपी नामे अविनाश पिंगळे व वैभव इंगळे हे फरार झाले होते. गुन्ह्याच्या तपासामध्ये तपासाधिकारी म्हणून श्री कमलेश मीना पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी केज यांच्या मार्गदर्शनाखाली सदरचा गुन्हा दाखल होताच, सह पोलीस निरीक्षक वाघमोडे सोबत पोह 453 भुसारी, गायसमुद्रे यांच्या पथकाने आरोपीचा शोध सुरू केला. सदर आरोपी हे गुन्हा घडल्यापासून फरार होते. आरोपी बाबत गुप्त बातमीदार मार्फत माहिती काढून तांत्रिक तपास करून आरोपीचा शोध घेऊन, आरोपी नामे अविनाश पिंगळे यास दिनांक 14 मे रोजी तर वैभव इंगळे यास 15 मे रोजी अटक करून लॉकअप मध्ये जेरबंद केले असून या आरोपी अटकेची कारवाई अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती चेतना तिडके, अंबाजोगाई व सहाय्यक पोलीस अधिक्षक उपविभाग केज यांच्या मार्गदर्शनाखाली श्री डी बी वाघमोडे सह पोलीस निरीक्षक पोहे 453 भुसारी 19 20 गाय समुद्रे यांनी केली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस अधिक्षक श्री कमलेश मीना हे करत आहेत.रात्री उशिरापर्यंत या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )